१९१७ सालची गोष्ट! विनायक शिवराम साळवी नावाचा अवघ्या पंधरा वर्षांचा एक मुलगा घर सोडून शिक्षणाच्या ओढीने रत्नागिरीहून कोल्हापूरला आला... आणि शाहू महाराजांना भेटला. पुढे अधिकारपदांवर काम केलेल्या साळवींच्या आयुष्याला कलाटणी देणारे हे वर्ष. त्यांनी लिहून ठेवलेल्या आणि त्यांच्या पश्चात मागे उरलेल्या या आठवणी -

**कै. विनायक साळवी**

यांच्याच शब्दांत-



**मी** तेव्हा इंग्लिश चौथीतून पाचवीत गेलो होतो. वडिलांच्या जंगल खात्यातील नोकरीची समाप्ती झाली होती. १९१७ च्या एप्रिलमध्ये आम्ही होनावरहून रत्नागिरीला दाखल झालो. माझ्याखेरीज माझे दोन धाकटे भाऊ आणि दोन बहिणी ही माझ्या आई-वडिलांची कौटुंबिक जबाबदारी होती. पेन्शनच्या ४० रुपयांवर हे बिऱ्हाड यापुढे चालवायचे होते. साहजिकच मासिक आवक एकदम निम्म्यावर आल्यानंतर भाऊ आणि अक्का सचिंत असत. प्रॉव्हिडंट फंडाची जी तुटपुंजी पुरचुंडी हाती आली, ती मला वाटते होनावर- रत्नागिरी या त्या काळच्या दीर्घ प्रवासात कामी आली. तात्पर्य, पदरी शिल्लक शून्य होती आणि आम्हा मुलांचे शिक्षण आणि संगोपन हा क्षणाक्षणाला भेडसावणारा प्रश्न माझ्या माता-पित्यांची झोप उडवीत होता, हे मी नजरेआड करू शकत नव्हतो. माझा जन्म १९०२ चा. म्हणजे मी तेव्हा १५ वर्षांचा असलो तरी भाऊ, अक्का यांची अस्वस्थता जाणण्याएवढा प्रौढ म्हणा, समजूतदार म्हणा- निश्चित होतो.

रत्नागिरी हायस्कूलचे तेव्हाचे मुख्याध्यापक श्री. गोखले हे समंजस गृहस्थ असल्याचे ऐकिवात होते. त्यांना भेटून सत्य परिस्थिती कानावर घाला, ते मुलाच्या फीमध्ये काही सवलत नक्की देतील, असे आमच्या हितचिंतकांनी सुचविले. त्यावर भिस्त ठेवून भाऊ आणि मी त्यांच्या बंगल्यावर गेलो. भाऊनी तोपर्यंत कधी कुणाकडे हात पसरला नव्हता. त्यांचा हात सदैव देणाऱ्याचा होता. आपली कहाणी गोखल्यांकडे सादर करताना त्यांना किती यातना होत होत्या, हे मी अनुभवीत होतो. सरांनी भाऊंचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले आणि धीर देताना म्हणाले, 'मुलाची प्रगती मी जातीने पाहीन आणि दोन-तीन महिन्यांत विद्यार्थी होतकरू आढळल्यास त्याला फ्रीशिप देण्यासंबंधीची शिफारस अवश्य करीन.'

गोखले सरांचा निरोप घेऊन आम्ही घरी परतताना सद्‌गदित होऊन भाऊ मला म्हणाले, 'गोखले भले गृहस्थ दिसतात, नाही?' मी मनात म्हटले, 'अहो, दोन जातिवंत सुसंस्कृत भले गृहस्थ एकमेकाला सामोरे आले, एवढे मला ठाऊक आहे.'

माझ्या वडिलांच्या तोंडून मी छत्रपती शाहू महाराजांच्या मोठेपणाच्या, कौतुकाच्या हकिकती पदोपदी ऐकत आलो होतो. आजूबाजूलाही त्यांची प्रशंसा कानी पडत होती. या सर्व गौरवाचा सारांश असा होता- 'कुणाही गरजू विद्यार्थ्याने त्यांच्या पायाशी लोळण घ्यावी आणि विद्यार्जनासाठी मदतीची गळ घालावी. त्या कुणालाही महाराज

# शाहूस्पर्श

हातोहात पंखाखाली घेतील, त्याला मायेची ऊब देतील आणि त्याचा सर्वांगाने उद्धार करतील,' ही ग्वाही या वक्तव्यात समाविष्ट होती.

गोखले यांच्याकडून घरी परतताना मनात विचार घोळू लागले. कसेही करून आपल्या एकट्यापुरता तरी बोजा वडिलांच्या माथी मारावयाचा नाही. घरातून पळून थेट महाराजांकडे हजर व्हायचे आणि परिणामी आपले शिक्षण पूर्ण करावयाचे.

५-६ जूनला साधारणतः शाळा सुरू होतात. ॲडमिशन फी अडीच रुपये, वर्गाची मासिक फी अडीच रुपये आणि गेम्स फी म्हणून घेतले जाणारे चार आणे अशी सव्वापाच रुपयांची तरतूद भाऊ-अक्का यांना करणे अवश्य होते. इकडून तिकडून मोठ्या मेटाकुटीने त्यांनी ही रक्कम माझ्या हवाली केली. घरातून पलायन करण्याची माझी योजना आता पक्की झाली होती. अंगावर नेसूचे धोतर आणि सदरा याखेरीज अधिक कपडे घ्यावयाचे नाहीत. सुदैवाने लंगोटाची सवय असल्याने दोन लंगोट मात्र घ्यावयाचे आणि पुस्तके व्यवस्थित बांधता यावीत म्हणून एका पंचाची निवड करावयाची, हे ठरविले. दोन-तीन मोडक्या काड्यांची एक जीर्ण छत्री सोबत घेतली.

सहा जूनला सकाळी १० वाजता मी "घरातून (झाडगावातून) जरा लवकर जाणार आहे" हे जाहीर केले होते. बावा साळवी माझ्याबरोबर निघावयाचा होता. "आज पहिलाच दिवस असल्याने बावाला म्हणावे, मी जरा लवकरच पुढे होत आहे." हे अक्काच्या कानावर घातले आणि वाटचाल सुरू केली ती थेट हातखंब्याच्या दिशेने. रत्नागिरी- हातखंबा हे अंतर साधारण १० मैलांचे आहे. हातखंब्याच्या धारेवर (सीमेवर) पोहोचेपर्यंत संध्याकाळचे साडेचार झाले आणि जोराचा पाऊस सुरू झाला. पाच-दहा मिनिटे एका झाडाखाली काढली. पाऊस लवकर थांबणार नाही, हे लक्षात येताच हातखंबा गावाकडे निघालो. हातखंबा फाटा हे एक जंक्शन आहे. डावीकडचा रस्ता चिपळूण- मुंबईकडे जातो आणि खाली सरळ जाणारी दोन-अडीच मैलांची उतरंड तुम्हाला हातखंब्याला नेते. (मी शाळेत हजर नव्हतो- ही बातमी बावाने मधल्या सुट्टीत घरी पोहोचवली आणि शोधाशोध सुरू झाली, हे मला मागाहून कळले.) शिरगावमार्गे चिपळूणकडे जाणारी एक पाऊलवाट त्याकाळी उपलब्ध होती. त्या वाटेने एक चौकडी गेली. अशीच आणखी एक बॅच हातखंब्याला रवाना झाली. मला निदान अडीच तासांची आघाडी मिळाल्याने मी हातखंबा गावात सहाला पोहोचलो आणि मला शोधावयास बाहेर पडलेली दुसरी तुकडी नाक्यावरून परतली तेव्हाही सहा वाजले होते.

हातखंब्यात, नाचण्याचे एक सावंत चहाचे छोटेसे दुकान चालवीत. अंगावरचे कपडे त्यांच्याच दुकानासमोर पिळले आणि ओलेत्याने त्यांच्याकडचा एक कप चहा प्यालो. तोपर्यंत या गृहस्थांनी मी कोण, कुठला, वगैरे चौकशी केली. मीही न लपविता सत्य परिस्थिती निवेदन केली. शाहूमहाराजांच्या पायाशी पोहोचण्याचा माझा इरादा सांगितला.

"आता आठ-साडेआठला रत्नागिरीहून मलकापुराकडे जाणाऱ्या बाजाराच्या बैलगाड्या दाखल होतील. त्यापैकी एका गाडीने तुझी सोय करून देता येईल," हे त्यांनी सांगितले. साडेसातला सावंत दुकान बंद करून घरी जाण्यास निघाले. निघताना, "आता तुझ्या जेवणाचे तू काय करणार आहेस?" ही पृच्छा आली. मी गप्प आहे, हे पहाताच तेही न बोलता निघून गेले. अर्ध्या तासाने परतले ते कागदाच्या एक पुडीतून एक भाकरी आणि उकडलेले एक अंडे माझ्यासाठी घेऊन आले. मी खाऊन घेतले आणि मोबदल्यादाखल चार आणे देऊ केले. ते त्यांनी अनमान न करता स्वीकारले. त्यांनी म्हटल्याप्रमाणे गाड्या सव्वाआठला हजर झाल्या. एका गाडीवानाशी बोलणी करून बारा आणे गाडीभाड्याच्या बोलीने माझी मलकापूरपर्यंतची तजवीज करून टाकली. सावंतांना प्रणाम करून मी गाडीत स्वार झालो आणि पाच मिनिटांत झोप लागली. हातखंबा-साखरपा हे पस्तीस मैलांचे अंतर कापण्यात रात्र गेली. सकाळी साडेनऊला आम्ही साखरप्याला पोहोचलो. जवळच्याच देवळात जाऊन तिथल्या विहिरीवर आंघोळ उरकली आणि परत गाडीकडे आलो. गाडीवानाने विचारले, "आम्ही जेवण करणार आहोत. सागोती करण्याचा विचार आहे. तुला आमच्या हातचे चालेल का?" मी "न चालायला काय झाले?" असे उत्तरताच "मग तुला आठ आणे वर्गणी द्यावी लागेल," ही रास्त व्यवहारी समज मिळाली. मी ताबडतोब आठ आणे देऊन टाकले. जेवण तयार होण्यात किमान दोन-अडीच तास जाणार होते. मी काहीसा मस्तीने ऐटीत बाजारात फिरत होतो. साखरपा पुलीस ठाण्यावर ड्युटीवर असलेल्या जमादारनी मला पाहिले. (एव्हाना जवळपासच्या सर्व पुलीस ठाण्यांवर रत्नागिरीहून माझ्या वर्णनाचा तपशील असलेल्या तारा येऊन थडकल्या होत्या.) "अरे, इकडे ये रे" अशी काहीशी दटावणीची साद आली. मी थबकलो आणि जवळजवळ उद्धटपणे त्यांना म्हणालो, "का, कशासाठी बोलावता मला?" जमादारांनी मग आवाज किंचित समजुतीचा करून "अरे, इकडे ये रे" असे म्हटल्यानंतर त्यांच्या पुढ्यात उभा राहिलो. "घरातून पळून आला आहेस ना? आम्हाला सर्व कळले आहे. तुला मुकाट्याने तात्काळ रत्नागिरीला परत पाठविण्याच्या आज्ञा

आम्हाला मिळाल्या आहेत.'' एवढे त्यांचे बोलून झाले आणि मी म्हणालो, ''तुम्ही आता वाटेल ते केले तरी मी घरी परत जाणार नाही. मी शिक्षणासाठी बाहेर पडलो आहे. आई-वडिलांवर पोसण्याचा भार पडू नये म्हणून शाहूमहाराजांची गाठ घेऊन त्यांना 'मला पदरी घ्या' ही गळ घालणार आहे.''

पंधरा वर्षांचा असलो तरी लिहिणे, बोलणे आणि वागणे, उत्तम संस्काराअंती चांगलेच आत्मसात केले होते. ही पुण्याई अर्थातच माता-पित्यांची. माझा निर्धार पाहून जमादारसाहेब समजून चुकले, की हे प्रकरण वेगळे आहे.

''ठीक आहे, शिक्षणासाठी बाहेर पडला आहेस म्हणून मी तुला आता अडवीत नाही. पण पहा बरे बाळ, माझ्या चांगुलपणाला जाग. मला दगा देऊ नकोस,'' हे कळवळून सांगितले. मी त्यांना नमस्कार करून म्हटले, ''असली बेइमानी माझ्याकडून कदापि होणार नाही, हे आश्वासन समजा.'' त्यांनी माझ्या गाडीवानाला गाठून ताकीद दिली. ''याला लुबाडण्याचा प्रयत्न केलास तर याद राख. माझ्याशी गाठ आहे. आणखी पैसे वगैरे उकळायचे नाहीत- काय?'' माझ्या पाठीवर हात फिरवून ''जा, सांभाळून जा,'' असा आशीर्वाद दिला. ''शिक्षणासाठी घर सोडण्याच्या निर्धाराने बाहेर पडलेल्या या मुलाला मी माझ्या जबाबदारीवर पुढे जाऊ देत आहे,'' असा अहवाल रत्नागिरीला रवाना केला आणि पर्यायाने माझ्या खुशालीची बातमी माझ्या आई-वडिलांना अठ्ठेचाळीस तासांच्या आत प्राप्त झाली.

आठ तारखेला सकाळी नऊ वाजता आम्ही मलकापूरला पोहोचलो. इथून कोल्हापूर ३५ मैल दूर आहे. नेहमीप्रमाणे गावातील देवळाच्या विहिरीवर स्नान उरकले. एका जैनाच्या दुग्धालयात एक कप दूध प्यालो आणि परत गावात, बाजारात आलो. कोल्हापूरला जाण्याची काही सोय होते का, ही चौकशी सुरू केली. परमेश्वराने तोंड बरे दिले होते. इकडे विचार, तिकडे तोंड उघड- हा प्रकार नेहमीच करीत आलो. कोणीतरी बातमी दिली की, एका एक्क्याने (एका बैलाची गाडी) मलकापूरची काही व्यापारी मंडळी कोल्हापूरला निघणार आहेत. त्यांना सामील झालो. सव्वा रुपया भाडे ठरले.

दुसऱ्या दिवशी सकाळी साडेनऊ वाजता मी कोल्हापूरला गंगावेसेवर उतरलो. एका खानावळीत आंघोळ उरकून जेवण तयार होण्याची वाट पाहत पडवीत बसलो होतो. बाजूला वाचत बसलेल्या एका मध्यमवयीन सद्‌गृहस्थांनी चौकशी केली आणि मी माझे मनोगत सांगितले. या भल्या गृहस्थांचे आडनाव आता विस्मृतीत जमा झाले आहे याची मला शरम वाटते. इतके या गोष्टीतील त्यांचे स्थान महत्त्वाचे आहे. ते महाराजांचे चाहते होते. याखेरीज ते बऱ्यापैकी वाचन केलेले सुविद्य सज्जन होते, हेही माझ्या लक्षात आले.

''महाराजांचे नावे एक अर्ज लिही आणि त्यात तुझी सर्व माहिती असू दे. अर्ज लिहून मला दाखव.'' हे त्यांनी सुचविले. पंधरा मिनिटांत मी एक बऱ्यापैकी मसुदा तयार केला. अगदी पहिल्यापासून उत्तम शिक्षक लाभले होते आणि त्यात आमच्या भाऊंच्या देखरेखीखाली मराठी, इंग्लिश, संस्कृत ग्रहण केले असल्याने अर्ज लिहिताना काहीं अडचण भासली नाही. अर्जात त्या काळच्या शिरस्त्यानुसार ''I belong to a respectable family'' हे वाक्य मी घातले होते. (दुर्दैव आहे की, अजूनही ही मूर्ख ओळ सर्रास वापरीत आहे!) माझ्या बुजुर्ग हितचिंतकांनी माझा अर्ज वाचला आणि शेरा दिला, ''तुझे इंग्लिश चांगले आहे. अर्ज व्यवस्थित लिहिला आहेस. फक्त यातील एक ओळ महाराजांना खटकेल. एवढेच नव्हे तर ते आक्षेपही घेतील. Our Maharaj belives that every human being is bom respectable. तेव्हा माझे तुला सांगणे असे, की ही ओळ वगळून तुझा अर्ज तू परत लिहून काढ. याच्याही पुढे जाऊन माझे सांगणे असे की, महाराजांच्या मानवी समतेच्या व्याख्या किती व्यापक आहेत, ते कधीही नजरेआड होऊ देऊ नकोस. तुझ्या एकंदरित वागण्यावरून मला भरवसा वाटतो की, माझे बोलणे तुला निश्चित बोधप्रद वाटले.'' (या महात्म्याने त्या पौगंडावस्थेत मला दिलेला मंत्र मी प्रामाणिकपणे अव्याहत जपला.)

जेवणाची वेळ झाली तेव्हा या पितृतुल्य उमद्या गृहस्थांनी मला 'जेवायला बसूया' ही खूण केली. ''महाराजांचा मुक्काम सध्या शिरोळला आहे. थोडी घाई करशील तर आणखी दोन तासांनी शिरोळला जाण्यासाठी आगगाडी तुला उपलब्ध आहे,'' ही महत्त्वाची बातमी त्यांनीच पुरविली. गंगावेस ते कोल्हापूर रेल्वे स्टेशन हे अंतर निदान तीन मैल आहे. धावत-पळत स्टेशन गाठले, गाडी मिळाली आणि दुपारी साडेचारला मी शिरोळ रोड स्टेशनवर उतरलो. (आता याचे नाव बदलून हातकणंगले झाले असावे.) शिरोळ रोड स्टेशनापासून शिरोळ गाव ही पाच मैलांची पायपीट होती. शिरोळ येथील महाराजांच्या रेस्ट हाऊसवजा बंगल्यावर पोहोचलो तेव्हा संध्याकाळचे सहा वाजले होते. जवळची तुटपुंजी माया आता संपली होती. शेवटची चवली खिशांत होती. त्या रात्री उपाशी झोपलो. मुक्काम अर्थातच देवळात आणि सकाळची आंघोळही तिथेच. सकाळी एक कप दूध प्यालो आणि शेवटची चवली संपली. महाराजांच्या बंगल्यावर चौकशी करावयास गेलो. ''महाराज केव्हा आणि कुठे भेटतील?'' या नम्र चौकशीला तिथल्या व्यवस्थापकांनी ''अरे हड'' असे म्हणून बोळवण केली. हा अपघात.'कुरवाळीत बसणे आणि नाउमेद होणे परवडण्यासारखे नव्हते. दोन दिवसांनी म्हणजे ११ जूनला महाराजांच्या शिकारीच्या मुक्कामी पोहोचलो.

शिकारीला गेलेल्या गाड्या (ट्रक्स) परतल्या होत्या. ट्रकमध्ये महाराज नेहमी ड्रायव्हरच्या शेजारी आणि बाकीची मंडळी हौद्यात- अशी योजना असावयाची. मी महाराजांच्या सेवकवर्गासमवेत उभा राहिलो. महाराज प्रत्यक्षात कसे दिसतात, हे मला ठाऊक नव्हते. समोरच पंधरा फुटांवर दोन तगड्या पहिलवानी यष्टीच्या सव्वासहा फूट उंचीच्या व्यक्ती उभ्या होत्या. त्यापैकी एक गृहस्थ चांगले गोरेपान आणि दुसरे जरा सावळे आणि किंचित राकट होते. गोरी मूर्ती महाराजांची असावी, अशी माझी समजूत. खात्री करून घ्यावी म्हणून एकाला हलकेच विचारले, ''यातले महाराज कोणते?'' माझ्या शेजाऱ्याने माहिती पुरविली, ''ते सावळं दिसत्यात ते आपले महाराज आन् उजळ हैत ते महाराजांचे जानीदोस्त आबालाल.'' महाराजांचे विश्वस्त, खास दोस्त, सवंगडी, खूशमस्करे अशी चतुरस्र भूमिका आबालाल यांची होती. यातली थोडीशी माहिती होती. आबालाल हे महाराजांचे अतिविश्वासू मित्र- ही ओळख जशी महत्त्वाची, तेवढीच ख्याती त्यांचे चिरंजीव हिम्मतलाल यांची होती. उत्तम फुटबॉलपटू ही त्यांची कीर्ती आम्हाला ज्ञात असल्याने हिम्मतलाल आमचे हीरो होते.

महाराजांची प्रत्येक हालचाल मी प्राण डोळ्यात आणून निरखीत होतो. महाराज जरा बाजूला गेले. आडोसा पाहून लघुशंका उरकून, तुमानीची बटणे लावत परतले आणि

पाऊस सुरू झाला. महाराज झाडाखाली थांबले आणि मी झट्कन पुढे होऊन त्यांचे पाय धरले. यापुढील संवाद असा :

"आरं, कोन हाय रं? कोन हायस् तू?"

"मी एक गरीब विद्यार्थी आहे सरकार."

"कुठून आलायस?"

"रत्नागिरीहून सरकार."

"रत्नागिरीस्नं म्हंजी...."

(ज्योतिबाच्या परिसराला त्या काळात रत्नागिरी म्हणत, हे ठाऊक होते म्हणून मी महाराजांना दुरुस्त केले.)

"मी कोंकणातून आलोय्, सरकार."

"कश्यापायी आलायस?"

(महाराजांची ९८ टक्के प्रजा अडाणी, अशिक्षित असल्याने, महाराज मुद्दामच त्यांच्याशी एकरूप होण्याच्या उद्देशाने रांगड्या मराठीत बोलत. त्याच विशिष्ट ढंगात ते माझ्याशी बोलत होते.)

"घरास्न पळून आलायस, न्हवं?"

"जी सरकार."

"घरांत सावत्रपनाचा जाच आसल?"

"मुळीच नाही महाराज."

"घरांत माया द्याया कुनी न्हाई?"

"आमच्या घरात सर्वांना उदंड प्रेम लाभले आहे, सरकार. त्या दृष्टीने आम्ही भाग्यवान आहोत..."

"मग बानं दुसरी बाईल ठ्येवली आसल?"

(मुले घरातून पळून जाण्याची सर्व कारणे महाराजांना चांगली अवगत होती.)

"नाही सरकार. माझ्या आई-वडिलांसारखी देवमाणसे कुणाला लाभणार नाहीत. वडिलांनी पेन्शन घेतले आहे. पेन्शन जेमतेम चाळीस रुपये आहे. निदान माझा एकट्याचा बोजा कमी व्हावा म्हणून मी घर सोडले आहे."

"आसं व्हयृ..." एवढे म्हणून महाराजांनी मला थोपटल्यासारखे केले.

"शिकाया आलायस म्हनतोस; कुठवर शिकशील रं?"

"महाराज शिकवतील तेवढे शिकेन सरकार."

"बी.ए. होईस्तवर शिकशील का?"

"जी सरकार."

एवढे झाले आणि महाराजांनी माझे दोन्ही खांदे चांगले दाबून पाहिले. निदान तीन-चार मिनिटे त्यांनी माझे खांदे चांगले दाबून धरले. चांगलीच रग लागली होती, पण मी हूं का चूं केले नाही.

(गडी काय कुवतीचा आहे याची ही चाचपणी होती, हे मला होस्टेलला गेल्यानंतर माझ्या सोबत्यांमार्फत कळले. महाराजांचा लाडका पहिलवान देवाप्पा त्यांनी असाच पारखून घेतला होता, हेही तेव्हाच कळले.)

"बरं बरं, भिऊ नगस. म्या हाय् की आता तुला संभाळाया."

एवढे होत आहे तो रिमझिम पडणाऱ्या पावसाने चांगला जोर पकडला. महाराज स्वस्थ उभे होते. मोडकी छत्री हातात असूनही ती महाराजांच्या डोक्यावर धरण्याचे मला सुचले नाही. समोरच्या एकाने, "आरं, म्हाराज् भिजल्यात. वाईच छत्री उघड की," ही सूचना केली.

माझी अर्धमेली छत्री उघडून त्यांच्या सव्वासहा फूट उंचीच्या माथ्यावर धरण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. महाराजांनी ती छत्री माझ्या हातून काढून घेतली आणि माझ्या डोक्यावर अशी धरली, की मी कोरडा राहावा. महाराज सचैल भिजले होते. मी व माझे पंचांत लपेटलेले दप्तर महाराजांमुळे सुके राहिले. मी धीर करून बोललो, "महाराज, मी दोन दिवसांचा उपाशी आहे."

"आस्सं व्हय्. भुका लागल्यात जनुं. आता बघूया की त्येंचं बी." हे एका मातेने बोलावे अशा ममतेने महाराज बोलले आणि मला कवेत घेतले. तिकडून नोकराने निदान तीन शेर तरी मावेल एवढ्या दुधाची एक छोटी घागर म्हाराजांच्या हाती दिली. उभ्या उभ्या महाराजांनी घटाघट ते दूध संपवून टाकले. पाठोपाठ दुसऱ्या नोकराने अनारशांनी गच्च भरलेली एक परात आणली. चांगले पसाभर अनारसे महाराजांनी माझ्यापुढे केले. मी किंचित संकोचलो. हे पहाताच माझ्या केसांवरून हात फिरवीत महाराज मला म्हणाले, "आरं, खा की मर्दा." ही रगेल, प्रेमळ सूचना मी तंतोतंत पाळली. चांगले सहा अनारसे भराभर खाऊन घेतले. यानंतर आणखी एक परात आली. तिच्यात उत्तम काप्या फणसाचे गरे होते. त्यांची एक प्रचंड ओंजळ महाराजांनी स्वहस्ते मला दिली. "खा आता प्वाटभर" ही समजही दिली. निदान एक डझन गरे मी खाल्ले. महाराज नंतर मला म्हणाले, "आता जाऊ नगस्. थांब हितंच." माझी मोडकी छत्री, दफ्तर सांभाळत मी बाजूला मुकाट्याने उभा राहिलो.

अर्ध्या तासाने गाड्या कोल्हापूरकडे राजवाड्यात जाण्यासाठी त्वरा सुरू झाली. महाराज ज्या ट्रकमध्ये बसले होते त्या ट्रकमध्ये हौद्यात जागा मिळविण्यासाठी मी धडपड करीत होतो. तिथल्या लोकांनी, "अरे हाट्. हो बाजूला," असे म्हणत मला प्रतिबंध केला. मी तडक महाराजांच्या ट्रकसमोर जाऊन उभा राहिलो. महाराजांचे आधी माझ्याकडे लक्ष नव्हते. ड्रायव्हरने "चल् हो बाजूला" आशी रागारागाने खूणही केली. मी दुर्लक्ष केले. एवढ्यात महाराजांनी मला पाहिले आणि हौद्यांतील लोकांना मला सोबत घेण्यास फर्माविले. दोन तासांनी आम्ही राजवाड्यावर पोहोचलो. जेवावयास पंगत बसली. आम्ही सर्व मंडळी खाली जाजमांवर आणि महाराज समोर मेजावर. हसत-खेळत, थट्टामस्करी होत जेवणाचा कार्यक्रम पार पडला. दोन दिवस राजवाड्याचा पाहुणचार मला लाभला. तिसऱ्या दिवशी महाराजांनी जातीने मला आर्य समाजाच्या वुडहाऊस होस्टेलमध्ये दाखल केले आणि माझे अध्ययन विनाअडथळा सुरू झाले.

शनिवारी दुपारी आम्ही कुस्त्यांची दंगल पाहावयास खासबागेत जात असू. बऱ्याच वेळा महाराज आपल्या लाडक्या देवाप्पाची करामत पाहण्यासाठी उपस्थित राहात. सांगली, जत, जमखिंडी, मिरज ही जवळजवळ महाराजांची मांडलिक संस्थाने. तिथेही उत्तम तालमी व पहिलवान तयार होत. महाराजांचा देवाप्पा मात्र अजिंक्य होता.

महाराजांना हुक्की आली की महाराज आमच्या होस्टेलला भेट देत. आम्ही आमच्या खेळांत वगैरे दंग असू. प्रसंगी महाराज आलेत, या जाणिवेने काहीसे गांगरूनही जात असू. महाराजांसाठी आसन म्हणून खुर्ची वगैरे आणण्याची धडपड करावी, हेही आम्हाला सुचत नसे. मग महाराज मोकळे हसून म्हणायचे, "आरं, तुमचं महाराज आल्याती. त्यास्नी बसाया द्या की काहीबाही."

(टीप : एक वर्षाच्या माझ्या कोल्हापूर येथील वास्तव्याच्या दरम्यान भाऊ- अक्का यांचा तगादा सुरू झाला- "तू घरी ये. आम्ही बेचैन आहोत," अशी विनवणी फार होऊ लागल्याने मी वर्षअखेर रत्नागिरीला परतलो. ग्रॅज्युएट होऊन महाराजांना प्रणाम करण्यासाठी हजर राहीन, असे स्वतःला बजावीत होतो. मी बी.ए. होण्यापूर्वीच महाराजांचे निधन झाले!)

– कृ. वि. साळवी